जळगाव दि. १५ (प्रतिनिधी) विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठीचे मोजकेपण नावीन्यपूर्ण उपक्रम विद्यार्थी विकास विभागामार्फत विद्यापीठ आणि महाविद्यालयांमध्ये राबविले जावेत अशी अपेक्षा कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी व्यक्त केली.

मंगळवार दि. १५ नोव्हेंबर रोजी प्राचार्य, संचालक, जिल्हा विद्यार्थी विकास समन्वयक आणि विद्यार्थी विकास अधिकारी यांची समन्वय व सहविचार कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे उद्घाटन करतांना कुलगुरू प्रा. माहेश्वरी बोलत होते. यावेळी मंचावर विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक प्रा. सुनील कुलकर्णी, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक प्रा. दीपक दलाल उपस्थित होते.

कुलगुरू आपल्या भाषणात पुढे म्हणाले की, आपल्या विद्यापीठाचा विद्यार्थी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत उतरेल असा तयार करण्याचे उद्दीष्ट सर्वांना डोळयासमोर ठेवायला हवे. त्यासाठी विद्यार्थ्याच्या व्यक्तीमत्वाचे पैलू पडावेत म्हणून अभ्यासाव्यतिरिक्त इतर उपक्रम राबविणे गरजेचे आहे. हे उपक्रम विद्यार्थी विकास विभागामार्फत राबविण्यासाठी सात कोटी रूपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरतील असे नाविन्यपूर्ण उपक्रम यामधून राबविले जावेत अशी अपेक्षा त्यांनी बोलून दाखविली. प्रारंभी प्रा. सुनील कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. उद्घाटनानंतर अर्थसंकल्पीय तरतूद आणि खर्च यावर सीए रवींद्र पाटील, प्रश्नसंच निर्मिती आणि ऑनस्क्रिन परीक्षा मूल्यांकन यावर प्रा. दीपक दलाल यांनी मार्गदर्शन केले.

दुपारच्या सत्रात लेखा परीक्षणांच्या अडचणींबाबत उपवित्त व लेखाधिकारी एस.आर. गोहिल, सनदी लेखापरीक्षक सीए ए.आय. कोठारी यांनी मार्गदर्शन केले. प्रा. सुनील कुलकर्णी यांनी विद्यार्थी विकास विभागाच्या उपक्रमांचा आढावा घेतला. सायंकाळी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे व कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांच्या उपस्थितीत कार्यशाळेचा समारोप झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुरूषोत्तम पाटील यांनी केले, वसंत वळवी यांनी आभार मानले.

## बातमी क्र. २

जळगाव दि. १५ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि जे.बी. प्लॅस्टोकेम प्रा. लि., जळगाव यांच्यात पी.व्ही.सी. साठी हिट स्टॅबिलायझर्स तयार करण्याकामी मार्गदर्शन करण्यासाठी करारपत्र करण्यात आले असून कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या उपस्थितीत स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

जे.बी. प्लॅस्टोकेम प्रा.लि.मि., जळगाव शहरातील स्टेबिलायझर्स तयार करणारी नामांकित कंपनी आहे. या करारानुसार विद्यापीठाच्या रासायनिकशास्त्र प्रशाळेच्या वतीने पी.व्ही.सी. साठी हिट स्टॅबिलायझर्स तयार करण्यासाठीचे व पृथ:करण करण्यासाठी मार्गदर्शन केले जाणार आहे. भविष्यात या प्रशाळेच्या विद्यार्थ्यांना या कंपनीत इंटर्नशिपसाठी देखील पाठविले जाणार आहे.

या कराराप्रसंगी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, कंपनीचे संचालक व व्यवस्थापक अविनाश जैन, अन्य संचालक कैलास खैरनार तसेच प्रा. विकास गीते, प्रा. अमरदीप पाटील उपस्थित होते.

## बातमी क्र. ३

जळगाव दि. १५ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या ३१ व्या दीक्षांत समारंभात ज्या विद्यार्थ्यांना पदवी/पदवीका प्रमाणपत्र घ्यावयाचे आहेत त्यांनी विलंब शूल्कासह दि. १६ नोव्हेंबर ते २१ नोव्हेंबर, २०२२ पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावयाचे आहेत.

विद्यापीठातर्फे ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२१ आणि एप्रिल/मे-२०२२ व त्यापूर्वी घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांसाठी आणि पीएच.डी. धारकांकरिता ऑनलाईन पदवी / पदविका प्रमाणपत्र अर्ज विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर Home Page वरील Student Corner-> Examination-> Convocation वर उपलब्ध आहे. विलंब शुल्कासह अर्ज भरण्याची मुदत दि.१६ नोव्हेंबर ते २१ नोव्हेंबर, २०२२ पर्यंत आहे. उत्तीर्ण वर्षापासून पाचवर्षाच्या आत पदवीप्रमाणपत्र शुल्क रूपये ३५०/- असून उत्तीर्ण वर्षापासून पाच वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असल्यास रूपये १०००/- भरावे लागतील तसेच विलंब शूल्क रूपये १००/- आहे. पदवीप्रमाणपत्राचे शुल्क क्रेडिट कार्ड/डेबीट कार्ड/ नेट बँकिग द्वारे ऑनलाईन भरावे असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन विभागाचे प्रभारी संचालक डॉ.दीपक दलाल यांनी केले आहे.

## बातमी क्र. ४

जळगाव दि. १५ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाव्दारे मुलाखत कौशल्य या विषयावर प्रा. राहूल त्रिवेदी यांची विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा घेण्यात आली.

दि.१४ नोव्हेंबर रोजी विद्यापीठातंर्गत प्रशाळेच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी झालेल्या या कार्यशाळेत राहूल त्रिवेदी, जळगाव यांनी मुलाखत कौशल्य या विषयावर संवाद साधला, मुलाखतीचे कौशल्य आणि तंत्र यातील फरक स्पष्ट करतांना त्यांनी विविध उदाहरणे दिली. यावेळी केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाचे समन्वयक प्रा. रमेश सरदार अध्यक्षस्थानी होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन अमेय भट्टाचार्य याने केले, देवदत्त बॅनर्जी याने आभार मानले. या कार्यशाळेत ३६२ विद्यार्थी उपस्थित होते.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: १५ नोव्हेंबर, २०२२

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी